ePaper
“भारताच्या भविष्याचे शिल्पकार”, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून विद्यार्थ्यांचं कौतुक
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज TM
15 August
WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 13 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## देशभरात स्वातंत्र्यदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

# स्वातंत्र्य दिन चिरायू होवो.!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**१५ ऑगस्ट २०२६ रोजी साजऱ्या होणाऱ्या स्वातंत्र्यदिनासाठी गृह मंत्रालयाने देशभरातील कार्यक्रमांची रूपरेषा जाहीर केली आहे. दिल्लीतील लाल किल्ल्यावर होणाऱ्या मुख्य सोहळ्यापासून राज्य, जिल्हा, ग्रामपंचायत आणि गावपातळीवरील कार्यक्रमांसाठी मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत.**

लाल किल्ल्यावर सशस्त्र दल आणि दिल्ली पोलिसांकडून पंतप्रधानांना गार्ड ऑफ ऑनर देण्यात येईल. त्यानंतर राष्ट्रगीत, ध्वजारोहण, २१ तोफांची सलामी, भारतीय हवाई दलाच्या हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी आणि पंतप्रधानांचे देशाला संबोधन होणार आहे. कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रगीत आणि त्रिरंगी फुगे सोडण्याची परंपराही कायम राहणार आहे. राष्ट्रपती भवनात संध्याकाळी ‘अॅट होम’ स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात येणार आहे.

राज्यांच्या राजधानींसह जिल्हा, उपविभाग, ब्लॉक, ग्रामपंचायत आणि गावपातळीवरही स्वातंत्र्यदिन कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. हे कार्यक्रम सकाळी ९ वाजल्यानंतर सुरू करण्याच्या सूचना आहेत. राज्यस्तरावर मुख्यमंत्र्यांच्या हस्ते, तर जिल्हास्तरावर मंत्री, आयुक्त किंवा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. ग्रामपंचायत आणि गावपातळीवर सरपंच किंवा ग्रामप्रमुख ध्वजारोहण करून नागरिकांना संबोधित करतील.

स्वातंत्र्यदिनानिमित्त प्रत्येक जिल्ह्यात प्रमुख ठिकाणी ‘स्वच्छ भारत अभियान’ राबविण्यात येणार आहे. शालेय विद्यार्थी, एनएसएस, ‘माय भारत’, एनसीसी, युवा संघटना आणि सामाजिक संस्थांचा सहभाग वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सरकारी विभाग आणि शैक्षणिक संस्थांनी वृक्षारोपण मोहिमा राबवाव्यात, असेही निर्देश आहेत.

‘एक भारत श्रेष्ठ भारत’ अंतर्गत राज्यांनी इतर पाच राज्ये किंवा केंद्रशासित प्रदेशांना आमंत्रित करून खाद्यसंस्कृती व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेला चालना देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

राजभवन आणि उपराज्यपाल भवनांमध्ये सायंकाळी ६ वाजल्यानंतर ‘अॅट होम’ कार्यक्रम आयोजित केला जाऊ शकतो. यासाठी दिव्यांगजन, पद्म पुरस्कार विजेते, शहीदांचे कुटुंबीय, पर्यावरण रक्षक, स्वच्छताग्रही, गुणवंत विद्यार्थी, उत्कृष्ट शिक्षक, संशोधक, नवोन्मेषक आणि क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय व्यक्तींना विशेष निमंत्रण देण्याचे निर्देश आहेत. विशेष निमंत्रितांसाठी २५ ते ५० जागा राखीव ठेवण्याची सूचनाही करण्यात आली आहे. याशिवाय देशभरातील सुमारे ३४३ प्रमुख ठिकाणी देशभक्तीपर बँड सादरीकरण आयोजित करण्यात येणार आहे.



### राज्यापासून ग्रामपंचायतीपर्यंत कार्यक्रम

गृह मंत्रालयाच्या निर्देशानुसार राज्यांच्या राजधानींसह जिल्हा, उपविभाग, ब्लॉक, ग्रामपंचायत आणि गावपातळीवरही स्वातंत्र्यदिन कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. हे कार्यक्रम सकाळी ९ वाजल्यानंतर सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यस्तरावर मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. त्यानंतर पोलीस, निमलष्करी दल, होमगार्ड आणि एनसीसी पथकांकडून गार्ड ऑफ ऑनर देण्यात येईल. जिल्हास्तरावर मंत्री, आयुक्त किंवा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येईल. ग्रामपंचायत आणि गावपातळीवर सरपंच किंवा ग्रामप्रमुख ध्वजारोहण करून नागरिकांना संबोधित करतील.

### स्वच्छता अन् वृक्षारोपणावर भर

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने प्रत्येक जिल्ह्यात प्रमुख ठिकाणी ‘स्वच्छ भारत अभियान’ राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यामध्ये शालेय विद्यार्थी, एनएसएस, ‘माय भारत’, एनसीसी, युवा संघटना आणि सामाजिक संस्थांचा सहभाग वाढविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पर्यावरण संरक्षणासाठी सरकारी विभाग आणि शैक्षणिक संस्थांनी वृक्षारोपण मोहिमा राबवाव्यात, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

**निवेदन**

आज शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ स्वातंत्र्यदिनानिमित्त 'महाईन्यूज' कार्यालयास सुटी असल्यामुळे रविवार, दि. १६ ऑगस्ट २०२६ चा अंक प्रकाशित होणार नाही. एजंट, विक्रेते, जाहिरातदार व वाचक यांनी याची कृपया नोंद घ्यावी.

- मुख्यसंपादक



### विशेष नागरिकांना ‘अॅट होम’चे निमंत्रण

राजभवन आणि उपराज्यपाल भवनांमध्ये सायंकाळी ६ वाजल्यानंतर ‘अॅट होम’ कार्यक्रम आयोजित केला जाऊ शकतो. या कार्यक्रमासाठी दिव्यांगजन, पद्म पुरस्कार विजेते, शहीदांचे कुटुंबीय, पर्यावरण रक्षक, स्वच्छताग्रही, गुणवंत विद्यार्थी, उत्कृष्ट शिक्षक, संशोधक, नवोन्मेषक आणि क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना विशेष निमंत्रण देण्याचे निर्देश आहेत. विशेष निमंत्रितांसाठी किमान २५ ते ५० जागा राखीव ठेवण्याची सूचनाही करण्यात आली आहे. याशिवाय स्वातंत्र्यदिनानिमित्त देशभरातील सुमारे ३४३ प्रमुख ठिकाणी देशभक्तीपर बँड सादरीकरण आयोजित करण्यात येणार आहे.

# ‘आवाज उठवला तर अडचणीत याल!’

## चाकणच्या उद्योजकांना धमक्या? रोहित पवारांचा उद्योगमंत्र्यांवर गंभीर आरोप

**महाईन्यूज । पुणे**

**‘उद्योगमंत्री उदय सामंत केवळ राजकीय उद्योग करित फिरत आहेत. ते काय आणि कसे करतात, हे आम्हाला माहिती आहे. त्यांनी राजकीय उद्योग बंद करुन उद्योगांच्या समस्या सोडविण्याकडे लक्ष द्यावे. एका व्यासपीठावर येऊन कोणत्या, किती कंपन्या बाहेर गेल्या आहेत, यावर चर्चा करण्याची हिंमत दाखवावी. एमआयडीसीच्या नवीन टप्प्यामध्ये जमिन विकत घ्यावी लागत असल्याने उद्योगमंत्र्यांना केवळ तिथे रस असतो. अडचणी सोडविण्यात कुठेही रस नाही’, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे.**



आमदार रोहित पवार यांनी शुक्रवारी चाकण एमआयडीसी परिसराची पाहणी केली. कंपन्यांना भेट दिली. तेथील उद्योजकांच्या समस्या जाणून घेतल्या. ‘कोणत्या, किती कंपन्या बाहेर गेल्या आहेत. त्यामुळे उद्योगाची, राज्याची आर्थिक परिस्थिती काय झाली आहे, हे पुराव्यास सांगायला तयार आहोत. त्यासाठी उद्योगमंत्र्यांनी एका व्यासपीठावर यावे. वाहतूक कोंडी नसलेल्या सुटीच्या दिवशी रविवारी ते येथे येणार आहेत. त्यांनी पोलिसांना न सांगता एकट्याने मोटारीतून यावे. वाहतूक कोंडीचा अनुभव घ्यावा’.

आमदार रोहित पवार म्हणाले, ‘सन २०१४ नंतर चाकण परिसरात एकही नवीन कंपनी आली नाही. दहा बाय दहाच्या खोलीत कार्यालय असणारी कंपनी दावोसमध्ये करार करते. २० हजार लोकांना नोकरी देतो असे सांगितले जाते. किती कंपन्यांनी करार केले. त्यांपैकी किती उद्योग सुरु झाले. याचे आकडे सरकारने सांगावे. उद्योगांमधून मिळणारा कर येथील सुविधांसाठीच वापरला पाहिजे. स्मार्ट मीटरमुळे उद्योजकांची २० टक्क्यांनी देयके वाढून आली आहेत. चाकण परिसरात एमआयडीसीचे रुग्णालय उभारावे’, असेही ते म्हणाले.

चाकण एमआयडीसी परिसरात बारा ते १५ लाख लोक काम करतात. पिंपरी-चिंचवड, तळेगाव दाभाडे या परिसरात २५ ते ३० लाख लोक काम करतात. कामगारांचा प्रवासात वेळ जातो. त्यामुळे खोल्यांमध्ये कामगार वर्ग राहतो. कामगारांच्या सुरिक्षततेकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचेही आमदार रोहित पवार म्हणाले.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील हे महसूलमंत्री असताना तलाठी भरतीचा पेपर फुटला होता. त्यात भ्रष्टाचार झाला होता. मॅटनेही त्यात भ्रष्टाचार झाल्याचा ठपका ठेवला आहे. त्यामुळे राधाकृष्ण विखे-पाटील यांनी अगोदर राजीनामा द्यावा. त्यानंतर शरद पवार यांच्यावर बोलावे, असेही आमदार रोहित पवार म्हणाले.

### अनेकांना धमक्या सुद्धा दिल्या गेल्या

चाकण एमआयडीसीमधील काही उद्योजक आम्हाला आज भेटणार होते. मात्र उद्योग मंत्र्यांच्या कार्यालयातून त्यांना फोन गेला. या विषयावर तुम्ही का बोलतायत, तुम्हाला अडचणी येऊ शकतात. अशा प्रकरचा दबाव त्यांच्यावर टाकल्याने अनेकांनी भेटण्यास नकार दिला असल्याचे आमदार रोहितपवार चाकण मध्ये म्हणाले. ज्या ज्या लोकांनी आवाज उठवला, त्या लोकांना बऱ्याच लोकांचे फोन केले की, तुम्ही का बोलताय, तुम्हाला अडचणी येऊ शकतात, तुमच्या धंद्याला प्रॉब्लेम येऊ शकतात. अनेकांना धमक्या सुद्धा दिल्या गेल्यात, अशी माहितीआहे.

# बारामतीत चायनीज मांजाचा सुळसुळाट; नागरिकांच्या जीवाला धोका

**महाईन्यूज । पुणे**

**नागपंचमी सणाच्या पार्श्वभूमीवर शहर व तालुक्यात पतंग उडविण्यासाठी चायनीज मांजाचा वापर केला जात असून, धारदार आणि जीवघेणा असलेल्या या मांजामुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होत आहे. दर वर्षी या मांजामुळे दुचाकीस्वार, पादचारी, तसेच पक्षी जखमी होण्याच्या घटना घडत असतात.**



त्यामुळे 'चायनीज मांजा नको, नागरिकांचा जीव वाचवा' अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

नागपंचमीच्या काळात पतंगबाजी केली जाते. त्यासाठी विविध प्रकारचा मांजा बाजारात उपलब्ध झाला आहे. मात्र, चायनीज मांजा अत्यंत धारदार असल्याने दुचाकीस्वारांच्या गळ्याला, हाताला किंवा चेहऱ्याला गंभीर दुखापत होते.

अनेक वेळा रस्त्यावर आडवा आलेला मांजा वाहनचालकांच्या लक्षात न आल्याने अपघात होतात. तसेच, विजेच्या तारांमध्ये मांजा अडकल्यास विद्युत अपघाताचा धोकाही वाढतो.

सध्या बारामती शहरातील विविध भागांमध्ये पतंग व मांजाची मोठ्या प्रमाणात विक्री सुरू झाली आहे. यामध्ये प्रतिबंधित चायनीज मांजाची विक्री होत आहे का? याची तपासणी करण्याची गरज आहे.

नगरपरिषद प्रशासन आणि पोलिसांनी संयुक्तपणे बाजारपेठेत तपासणी मोहीम राबवून चायनीज मांजा विक्री करणाऱ्या व्यावसायिकांना कडक तंबी द्यावी. नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर थेट कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

शहराच्या मध्यवर्ती भागात मोठ्या प्रमाणावर पतंग उडविले जात असल्याने रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनचालकांना त्याचा धोका होण्याची शक्यता असते. त्यामुळे गर्दीच्या व मध्यवर्ती ठिकाणी पतंग उडविण्यावर प्रशासनाने निर्बंध घालणे आवश्यक आहे.

तसेच शाळा, महाविद्यालये, बाजारपेठा, मुख्य रस्ते आणि वर्दळीच्या परिसरात पतंग उडविण्यास प्रतिबंध करण्याबाबत जनजागृती करण्याची गरज आहे. बारामतीकरांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत प्रशासनाने चायनीज मांजाची विक्री व वापर रोखण्यासाठी कठोर पावले उचलावीत, अशी अपेक्षा बारामतीकर व्यक्त करीत आहेत.

### अन्यथा पर्यावरण संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल

चायनिज मांजा विक्री करणाऱ्या दुकानांचा पोलिसांकडून शोध घेतला जात आहे. विक्री करणारे व वापर करणारे या दोघांवरही याबाबत कारवाई केली जाईल. पर्यावरण संरक्षण कायदा आणि भारतीय न्याय संहिता २७९ अन्वये कारवाई झाल्यास पाच वर्षांचा तुरुंगवास व एक लाखापर्यंत दंड होतो. त्यामुळे अशा मांजाची कोणी विक्री करू नये, कोणी तो वापरू नये, असे आवाहन शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांनी केले. नागरिकांनीही अशा प्रकारची विक्री आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती देऊन कारवाईसाठी सहकार्य करावे.

# आत्महत्येवरही राजकारण! रोहित पवारांच्या पोस्टवरून संताप

## कौटुंबिक वादातील घटनेला प्रशासनाच्या अपयशाचा मुलामा देण्याचा आरोप

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी कचरा डेपो दुर्घटनेत मृत्यू झालेल्या गणेश गायकवाड यांच्या पत्नी सोनाली गायकवाड यांनी आत्महत्या केल्याची घटना अत्यंत दुर्दैवी आणि मन हेलावून टाकणारी आहे. मात्र, या संवेदनशील घटनेचे दुःख बाजूला ठेवून तिच्या मृत्यूला थेट राजकीय रंग देण्याचा प्रयत्न होत असेल, तर तो अधिक संतापजनक आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमुळे हाच प्रश्न उपस्थित झाला आहे—डोके ठिकाणावर आहे का?**




### दुःखद घटनेला राजकीय रंग?

सोनाली गायकवाड यांच्या मृत्यूमागील नेमके कारण तपासातून स्पष्ट होण्यापूर्वीच त्याचा मोशी दुर्घटनेशी संबंध जोडल्याने प्रश्न उपस्थित झाले आहेत. 'संवेदनशील घटनेतही राजकारण कशासाठी?' असा सवाल केला जात आहे.

रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये सोनाली गावकवाड यांच्या आत्महत्येमागे मोशी दुर्घटनेतील नुकसानभरपाई, कुटुंबीयांची आर्थिक परिस्थिती आणि संबंधित प्रशासनाच्या भूमिकेचा संदर्भ दिला आहे. मात्र, कौटुंबिक वादातून घडलेल्या आत्महत्येची संपूर्ण वस्तुस्थिती अधिकृत तपासातून स्पष्ट होण्याआधीच त्याला राजकीय व्यवस्थेच्या अपयशाशी जोडणे कितपत योग्य?, हा सवाल आता उपस्थित होत आहे.

एखाद्या महिलेने आत्महत्या केली, तिच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला, अशा वेळी प्रथम गरज असते ती संवेदनशीलतेची. तपास यंत्रणांनी घटनेची कारणमीमांसा करावी, दोषी आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई व्हावी, पीडित कुटुंबाला न्याय मिळावा—यासाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेणे अपेक्षित आहे. मात्र, मृत्यूच्या घटनेला आपल्या राजकीय कथानकासाठी वापरणे हा संवेदनशीलतेचा नव्हे, तर राजकीय संधीसाधूपणाचा प्रकार आहे. मोशी दुर्घटनेतील मृत कामगारांच्या कुटुंबीयांना मदत, नुकसानभरपाई आणि पुनर्वसन याबाबत प्रशासनाने विविध निर्णय घेतले आहेत. त्यामुळे आता घडलेल्या प्रत्येक वैयक्तिक कौटुंबिक घटनेचा थेट संबंध मोशी दुर्घटनेशी जोडण्यापूर्वी वस्तुस्थिती, तपासाचे निष्कर्ष आणि संबंधित कुटुंबीयांची अधिकृत बाजू समोर येणे गरजेचे आहे.

कौटुंबिक वाद, मानसिक तणाव किंवा अन्य वैयक्तिक कारणातून घडलेल्या घटनेला राजकीय षडयंत्राचा किंवा प्रशासनाच्या अपयशाचा मुलामा देणे हा मृत व्यक्तीच्या दुःखाचा सन्मान आहे का? असा सवाल पिंपरी-चिंचवडकरांमधून उपस्थित होत आहे.

लोकप्रतिनिधींनी जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठवावा, प्रशासनाला जाब विचारावा, दोषींवर कारवाईसाठी पाठपुरावा करावा, यात दुमत नाही. पण एका दुःखद आत्महत्येच्या घटनेचे राजकीय भांडवल करण्याऐवजी त्या कुटुंबाला न्याय आणि आधार मिळवून देणे अधिक महत्त्वाचे नाही का?

सोनाली गावकवाड यांच्या मृत्यूचे खरे कारण तपासातून समोर यावे आणि दोषी कोणीही असेल तर त्याच्यावर कारवाई व्हावी, हीच अपेक्षा. मात्र, तपास पूर्ण होण्याआधीच निष्कर्ष काढून राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू करणे म्हणजे दुःखद घटनेवर राजकारण करण्याचा केविलवाणा प्रयत्न, अशी टीका आता होत आहे.

मोशी कचरा डेपोवर झालेली नैसर्गिक आपत्ती आणि त्यामध्ये ९ जणांचा झालेला मृत्यू ही पिंपरी-चिंचवडकरांसाठी संवेदनशील बाब आहे. या दुर्घटनेचे राजकारण करण्याची एकही संधी स्थानिक पातळीवर आणि राज्यस्तरीय नेत्यांनी सोडलेली नाही. आता कौटुंबीक वादाला महापालिका आणि राजकीय किनार देवून आमदार रोहीत पवार या प्रकरणातही दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे पिंपरी-चिंचवडमधून टिकेचा सूर उमटला आहे.

# आंधळे आयुक्त... मुकी जनता.. अन् बहिरे लोकप्रतिनिधी..!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी कचरा डेपोतील दुर्घटनेने पिंपरी-चिंचवडच्या कचरा व्यवस्थापनातील गंभीर त्रुटी उघड्या पाडल्या. दुर्घटनेला महिना उलटत आला, तरी शहरातील कचऱ्याचा प्रश्न संपण्याऐवजी अधिकच गंभीर होताना दिसत आहे. दुर्घटनेनंतर प्रशासनाकडून नवीन प्रकल्प, पर्यायी व्यवस्था आणि कचरा प्रक्रियेचे नियोजन याबाबत घोषणा झाल्या; मात्र प्रत्यक्षात रस्त्यांवरील कचऱ्याचे ढीग, विलंबाने होणारे संकलन आणि नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न कायम आहे.**




### मोशी दुर्घटनेतून धडा घेतला का?

दररोज सुमारे १ हजार ५०० टन कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी सक्षम यंत्रणा आवश्यक असताना शहरात कचऱ्याचे ढीग कायम आहेत. दुर्घटनेने दिलेला इशारा दुर्लक्षित केल्यास भविष्यातील संकट अधिक गंभीर होण्याची भीती.

एका बाजूला महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडून कचरा व्यवस्थापनासाठी विविध प्रकल्पांचे नियोजन असल्याचे सांगितले जात आहे. दुसऱ्या बाजूला पिंपरी, चिंचवड आणि भोसरी मतदारसंघातील अनेक भागांत कचरा संकलन व्यवस्थेचे चित्र वेगळेच आहे. त्यामुळे प्रशासनाच्या नियोजनाचा कागदावरील वेग आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीचा वेग यामध्ये मोठी दरी निर्माण झाली आहे.

महापालिका प्रशासनाने बायोगॅस-मिथेनेशन प्रकल्पाचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवला. त्याला राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या वाघेरे-उबाळे जोडीने विरोध केला. मोशी दुर्घटनेवर गळा काढून ओरडणाऱ्या सेना-राष्ट्रवादीला कचऱ्याचे डोंगर का उभे राहिले, याचा अभ्यास करता येईना. किंबहुना, कचरा समस्येवर उपाययोजना काय, याबाबत काहीही न बोलता केवळ राजकीय उद्देशाने प्रकल्पांना विरोध केला जात असेल, तर कचरा प्रश्न सोडवायचा कसा? हा प्रश्न निर्माण झाला आहे.

मोशी दुर्घटनेने केवळ एका प्रकल्पाची नव्हे, तर शहराच्या संपूर्ण कचरा व्यवस्थापन क्षमतेची पोलखोल केली. दररोज सुमारे १ हजार ५०० टन कचऱ्याचे संकलन, वाहतूक, वर्गीकरण आणि शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यासाठी सक्षम यंत्रणा आवश्यक आहे. मात्र, काही भागांत कचरा वेळेवर उचलला जात नसल्याच्या तक्रारी कायम आहेत. पावसाळ्यात रस्त्याच्या कडेला साचलेला कचरा, दुर्गंधी आणि आरोग्यविषयक धोके यामुळे नागरिक त्रस्त आहेत.

वेस्ट-टू-एनर्जी, बायोमायनिंग, बायोमिथेनेशन तसेच पर्यायी कचरा प्रक्रिया व्यवस्थेबाबत विविध पर्यायांची चर्चा सुरू आहे. मात्र नियोजनाच्या पुढे प्रत्यक्ष कामाला सुरुवात कधी होणार? नवीन प्रकल्पांची क्षमता, जागा, निधी, निविदा प्रक्रिया, पर्यावरणीय परवानग्या आणि कार्यान्वयनाचे निश्चित वेळापत्रक नागरिकांसमोर ठेवण्याची गरज आहे.

कचरा प्रश्न हा केवळ प्रशासनाचा नव्हे, तर नागरिकांच्या आरोग्याशी आणि शहराच्या भवितव्याशी संबंधित आहे. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधकांसह सर्व लोकप्रतिनिधींनी प्रशासनाला जाब विचारण्याची गरज आहे. कचरा रस्त्यावर पडला की नागरिक त्रस्त होतात; पण कचऱ्याचा प्रश्न राजकीय अजेंड्यावर कायम का राहत नाही? हा सवाल नागरिक विचारत आहेत. राजकीय उद्देशाने प्रकल्पांना विरोध करणाऱ्या नगरसेवकांसमोर आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी सरेंडर होतात का, असाही प्रश्न उपस्थित झाला आहे. पिंपरी-चिंचवडला स्वच्छ, सुंदर आणि विकसित शहर म्हणून पुढे नेण्याच्या दाव्यांच्या पार्श्वभूमीवर शहरातील कचऱ्याचे ढीग ही चिंतेची बाब आहे.

मोशी दुर्घटनेने प्रशासनाला मोठा इशारा दिला आहे. आता घोषणांपेक्षा कृतीची गरज आहे. प्रशासनाचे नियोजन कागदावर आणि नागरिकांचे प्रश्न रस्त्यावर, अशी परिस्थिती कायम राहिली तर 'स्वच्छ पिंपरी-चिंचवड'चा दावा केवळ घोषणेतच राहण्याची भीती आहे. 'आंधळे आयुक्त, मुकी जनता आणि बहिरे लोकप्रतिनिधी' अशी उपरोधिक स्थिती निर्माण होऊ नये, यासाठी आता कृतीची गरज आहे.



## भूमिका

**१५ ऑगस्ट हा केवळ दिनदर्शिकेवरील एक दिवस नाही. हा दिवस भारताच्या इतिहासातील एका महान संघर्षाच्या यशाची आठवण करून देतो. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताने परकीय सत्तेच्या जोखडातून मुक्त होत स्वतंत्र राष्ट्र म्हणून नव्या पर्वाची सुरुवात केली.**

# स्वातंत्र्याचा अर्थ : अधिकारांपलीकडची जबाबदारी

आज २०२६ मध्ये आपण स्वातंत्र्याचे ८० वे वर्ष साजरे करत असताना, स्वातंत्र्य मिळविण्यासाठी दिलेल्या बलिदानाबरोबरच या स्वातंत्र्याचे आपण काय केले, याचाही विचार करण्याची वेळ आली आहे.



स्वातंत्र्य मिळविणे हे जितके कठीण होते, तितकेच ते टिकविणे आणि समृद्ध करणे हीदेखील मोठी जबाबदारी आहे. स्वातंत्र्य म्हणजे केवळ आपल्याला मिळालेले अधिकार नव्हेत. आपल्या विचारांची मोकळीक, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, मतदानाचा अधिकार, शिक्षणाची संधी आणि आपल्या भविष्याचा निर्णय घेण्याची ताकद यांसोबतच कर्तव्याची जाणीवही तितकीच महत्त्वाची आहे. आज भारत जगाच्या पटलावर वेगाने पुढे जात आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन, संरक्षण, डिजिटल व्यवस्था आणि उद्योग या क्षेत्रांत देशाने मोठी झेप घेतली आहे. भारतीय तरुण जगभर आपल्या कौशल्याचा ठसा उमटवत आहेत. मात्र देशाची खरी प्रगती केवळ मोठ्या प्रकल्पांमध्ये किंवा आर्थिक आकडेवारीत मोजली जाऊ शकत नाही. शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचतो का, प्रत्येक नागरिकाला समान संधी मिळते का आणि सामान्य माणसाचे जीवन अधिक सुरक्षित, सन्मानाचे आणि सुखकर होते का, हा खरा विकासाचा मापदंड आहे.

स्वातंत्र्याची खरी परीक्षा आपल्या दैनंदिन वर्तनात होते. आपण कायद्याचा आदर करतो का? सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करतो का? जात, धर्म, भाषा आणि प्रांताच्या भिंती ओलांडून भारतीय म्हणून एकमेकांकडे पाहतो का? भ्रष्टाचाराला नकार देतो का? पर्यावरणाचे रक्षण करतो का? आपल्या मुलांना केवळ यशस्वी नव्हे, तर जबाबदार नागरिक बनवतो का? या प्रश्नांची उत्तरेच आपल्या स्वातंत्र्याची खरी गुणवत्ता ठरवतील. आजच्या काळात सामाजिक माध्यमांमुळे माहितीचा वेग प्रचंड वाढला आहे. त्याचबरोबर चुकीची माहिती, अफवा आणि द्वेष पसरविण्याचे आव्हानही वाढले आहे. अशा वेळी स्वातंत्र्याचा अर्थ कोणाच्याही भावना दुखावण्याचा परवाना नसून, विवेकाने आणि जबाबदारीने आपले मत मांडण्याची संधी आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

आपल्याला २०४७ मध्ये स्वातंत्र्याची शताब्दी साजरी करायची आहे. त्या भारताचे स्वप्न केवळ सरकारचे किंवा एखाद्या संस्थेचे नसावे. ते प्रत्येक नागरिकाचे स्वप्न असले पाहिजे. विकसित भारत म्हणजे आधुनिक रस्ते, उंच इमारती आणि प्रगत तंत्रज्ञान एवढेच नव्हे; तर शिक्षित समाज, सक्षम युवक, समृद्ध शेतकरी, सुरक्षित महिला, गुणवत्तापूर्ण आरोग्यव्यवस्था, रोजगाराच्या संधी आणि न्याय्य समाजव्यवस्था असलेला भारत होय.

म्हणूनच या स्वातंत्र्यदिनी आपण केवळ तिरंग्याला सलाम करून थांबू नये. देशासाठी आपण काय करू शकतो, याचा एक छोटासा संकल्प प्रत्येकाने करावा. एखादे झाड लावणे, सार्वजनिक स्वच्छता राखणे, प्रामाणिकपणे कर भरणे, गरजू विद्यार्थ्याला मदत करणे, वाहतुकीचे नियम पाळणे, मताचा योग्य वापर करणे किंवा आपल्या कामात प्रामाणिकपणा ठेवणे—राष्ट्रनिर्मितीची सुरुवात याच छोट्या कृतींपासून होते. ज्यांनी स्वातंत्र्यासाठी आपल्या वर्तमानाचा त्याग करून देशाचे भविष्य घडविले, त्या ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. मात्र त्यांना खरी आदरांजली म्हणजे त्यांच्या स्वप्नातील भारत घडविण्यासाठी आज आपण प्रामाणिकपणे काम करणे.

स्वातंत्र्य आपल्याला मिळाले आहे; पण स्वातंत्र्याचा खरा अर्थ पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आपली आहे. या ८०व्या स्वातंत्र्यदिनी एकच संकल्प करूया—देशाने आपल्याला खूप काही दिलंय, आता आपण देशाला काय देऊ शकतो, याचा विचार करूया.

**जय हिंद!**

## प्रासंगिक »

### प्रामाणिकपणाचे फळ

**एका गावात रामू नावाचा गरीब शेतकरी राहत होता. तो खूप मेहनती आणि प्रामाणिक होता. एकदा शेतात नांगरणी करत असताना त्याला जमिनीत एक सोन्याची पिशवी सापडली. पिशवीत अनेक सोन्याची नाणी होती.**


रामूला क्षणभर वाटले की, या पैशांमुळे आपल्या घरची गरिबी दूर होईल. परंतु लगेच त्याच्या मनाने सांगितले की, ही संपत्ती आपली नाही. रामूने पिशवी घरी न नेता थेट गावच्या सरपंचांकडे नेली. त्याने संपूर्ण घटना सांगितली. सरपंचांनी गावात चौकशी केली. काही दिवसांनी एक वृद्ध शेतकरी सरपंचांकडे आला. त्याची सोन्याची पिशवी शेतात हरवली होती. पिशवीतील नाण्यांची संख्या आणि खुणा सांगितल्यानंतर सरपंचांना खात्री पटली की ती पिशवी त्याचीच होती.

वृद्ध शेतकऱ्याने आनंदाने रामूचे आभार मानले आणि त्याला बक्षीस देऊ केले. मात्र रामूने बक्षीस घेण्यास नम्रपणे नकार दिला. त्याने सांगितले, "दुसऱ्याची वस्तू परत करणे हे माझे कर्तव्य आहे." रामूच्या प्रामाणिकपणाचे गावकऱ्यांनी कौतुक केले. त्याचा आदर्श पाहून अनेकांनी प्रामाणिकपणे वागण्याचा संकल्प केला.

- तात्पर्य : प्रामाणिकपणा माणसाला खरी प्रतिष्ठा मिळवून देतो.

वैद्यकीय प्रवेशासाठीची 'नीट' परीक्षा लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी जोडलेली आहे. त्यामुळे तिच्या आयोजनात किंचितही ढिसाळपणा परवडणारा नाही.

## 'नीट'च्या कारभाराला 'नेटकेपणा' कधी येणार?




मात्र, प्रश्नपत्रिकाफुटीच्या घटना, प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या तज्ज्ञांची निवड, सुरक्षा व्यवस्था आणि देखरेखीतील त्रुटी यामुळे राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या (एनटीए) कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

प्रश्नपत्रिकाफुटीनंतर सुरक्षाव्यवस्थेत अनेक बदल करण्यात आले. प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्यांची नावे गुप्त ठेवणे, छपाईच्या ठिकाणी मोबाइलवर बंदी, प्रश्नपत्रिकांची सुरक्षित वाहतूक, परीक्षा केंद्रांवर कडक देखरेख अशा उपाययोजना करण्यात आल्या. तरीही नव्या मार्गाने प्रश्नपत्रिका बाहेर गेली, हे व्यवस्थेतील मूलभूत उणिवांकडे निर्देश करते. एका समस्येवर उपाय करताना दुसऱ्या संभाव्य धोक्याचा विचार न करणे हीच मोठी त्रुटी आहे.

'एनटीए'च्या पुनर्बांधणीसाठी आता माहिती सुरक्षा, संशोधन, मूल्यमापन आणि दक्षता यांसारख्या क्षेत्रांत स्वतंत्र जबाबदाऱ्या निश्चित केल्या जात आहेत. ही पावले स्वागतार्ह आहेत; पण ती आधीच का उचलली गेली नाहीत, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. परीक्षा व्यवस्थेतील सुधारणा या घोटाळ्यानंतर नव्हे, तर घोटाळा होण्यापूर्वीच झाल्या पाहिजेत.

चीनमधील 'गाओकाओ' परीक्षेच्या व्यवस्थेकडूनही भारताला शिकण्यासारखे आहे. प्रश्नपत्रिकांची सुरक्षितता, वाहतूक, परीक्षा केंद्रांवरील शिस्त आणि विद्यार्थ्यांना वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचण्यासाठी केलेली मदत यासाठी तेथे व्यापक नियोजन केले जाते.

'नीट' ही केवळ परीक्षा नाही; ती लाखो तरुणांच्या स्वप्नांची पहिली पायरी आहे. त्यामुळे तांत्रिक बदलांपेक्षा विश्वासार्हता, पारदर्शकता आणि जबाबदारी महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ होऊ नये, यासाठी 'एनटीए'ने प्रत्येक त्रुटीतून धडा घेऊन कायमस्वरूपी सक्षम व्यवस्था उभी करणे गरजेचे आहे. 'नीट' नावापुरती नव्हे, तर प्रत्यक्षातही नीटनेटकी झाली पाहिजे.

## ।। अभंगवाणी ।।



आम्ही सदैव सुडके । जवळीं येतां चोर धाके ॥
जाऊं पुडी भिकें । कुतरीं घर राखती ॥१॥

नांदणूक ऐसी सांगा । नाहीं तरी वांयां भागा ॥
थोरपण अंगा । तरी ऐसें आणावें ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# तुकाराम मुंढेंच्या कारवाईचा धसका

## अनेक नामांकित हॉटेल्स, इराणी कॅफे यांचे शटर डाऊन, डागडुजी आणि स्वच्छतेवर भर

**महाईन्यूज । मुंबई**

**अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी हॉटेल्स आणि उपहारगृहांविरोधात सुरू केलेल्या धडक मोहिमेचा धसका मुंबईतील शहरातील हॉटेल व्यावसायिकांनी घेतला आहे. परवाना निलंबन आणि बदनामीच्या भीतीने मुंबईतील अनेक नामांकित हॉटेल्स, इराणी कॅफे आणि अगदी सरकारी उपाहारगृहांनीही आपले शटर तात्पुरते खाली खेचले असून दुरुस्ती, रंगकाम आणि संपूर्ण स्वच्छतेवर भर दिला आहे.**



गेल्या काही दिवसांत 'एफडीए'ने नियम धाब्यावर बसवणाऱ्या अनेक हॉटेल्सवर थेट धाडी टाकून त्यांचे परवाने निलंबित केले. इतकेच नाही तर किचनमधील अस्वच्छतेचे फोटो आणि व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसिद्ध केले जात असल्याने हॉटेलचालकांचे धाबे दणाणले आहेत. या कठोर कारवाईच्या पार्श्वभूमीवर 'इंडियन हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन'च्या (आहार – AHAR) सदस्यांपैकी तब्बल ५० टक्के व्यावसायिकांनी हॉटेल्सचे नूतनीकरण सुरू केले आहे.

दिवसा व्यवसाय सुरू ठेवता यावा यासाठी अनेकजण रात्रीच्या वेळी दुरुस्तीची कामे उरकत आहेत, तर काहींनी काही दिवसांसाठी हॉटेल्स पूर्णपणे बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचे सविस्तर वृत्त द इंडियन एक्सप्रेसने दिले आहे.

कारवाईपासून वाचण्यासाठी अनेक हॉटेलचालक आता खासगी अन्नसुरक्षा परीक्षकांची मदत घेत आहेत. तसेच कर्मचाऱ्यांना 'फोस्टॅक' अंतर्गत अन्नसुरक्षेचे विशेष प्रशिक्षण दिले जात आहे. 'हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन (वेस्टर्न इंडिया)'नेही अलीकडेच ४ हजारहून अधिक कर्मचाऱ्यांना हे प्रशिक्षण पूर्ण करून प्रमाणपत्र दिले आहे. बीकेसीमधील जिल्हाधिकारी कार्यालय आणि कलिना विद्यापीठातील उपाहारगृहेदेखील बंद असल्याचे सांगण्यात आले.

दक्षिण मुंबईतील नामांकित खाद्यपदार्थ केंद्रांवरही याचा परिणाम स्पष्टपणे दिसत आहे. फोर्ट परिसरातील एका केरळी उपहारगृहात पूर्वी दिवसातून दोनदा होणारी स्वच्छता आता तीनदा केली जात असून प्रत्येक वेळी ४५ मिनिटांसाठी 'डीप क्लिनिंग' केले जात आहे.

### आर्थिक नुकसानासह प्रतिष्ठेलाही धक्का

'आहार'चे अध्यक्ष विजय शेट्टी यांनी या कारवाईमुळे हॉटेलचालकांमध्ये निर्माण झालेल्या भीतीवर चिंता व्यक्त केली. "मुंबईत आमच्या संघटनेचे सुमारे ८ हजार सदस्य असून यात प्रामुख्याने मध्यमवर्गीयासाठींचे छोटे हॉटेल आणि इतर हॉटेल्सचा समावेश आहे. अनेक उपहारगृहे ही तिसऱ्या पिढीतील व्यावसायिक चालवत असून त्यांनी अनेक दशकांच्या मेहनतीने ही प्रतिष्ठा कमावली आहे. एफडीए केवळ कारवाईच करत नाही, तर त्यांची नावे उघड करून बदनामी करत आहे. अगदी छोट्या त्रुटींसाठीही परवाना निलंबित केला जात असल्याने व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून ते मानसिक तणावाखाली आहेत", असे विजय शेट्टी म्हणाले.

### सरकारी कँटीनही दुरुस्तीच्या नावाखाली बंद

कारवाईची ही धास्ती केवळ खासगी हॉटेल्सपुरती मर्यादित नसून शासकीय कार्यालयांमधील कँटीनमध्येही हाच प्रकार पाहायला मिळत आहे. 'एफडीए'च्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, एमएमआरडीए कार्यालयात तपासणीसाठी पथक पोहोचण्यापूर्वीच दुरुस्तीचे कारण देत कँटीन बंद ठेवण्यात आले होते

## महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान सर्व महसूली दावे निकाली

**महाईन्यूज । मुंबई**

**क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून महसूल विभागाने १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या सात महिन्यांच्या कालावधीत राज्यभरात 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान' राबविण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा अत्यंत महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला असून, यामुळे लाखो पक्षकारांना अर्धन्यायिक न्यायालयांच्या फेऱ्या, वेळ मोठा दिलासा मिळणार आहे. महसूल विभागाने, गुरुवारी (१३ ऑगस्ट ) या संदर्भातील शासन निर्णय जारी केला.

या अभियानांतर्गत महसूल प्रशासनातील सर्वात खालच्या स्तरापासून ते वरिष्ठ स्तरापर्यंतच्या सर्व अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या सर्व प्रकारच्या महसुली दाव्यांचा व अपीलांचा समावेश करण्यात आला आहे.

यामध्ये प्रामुख्याने मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार व तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अपर जिल्हाधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या न्यायालयातील प्रलंबित दाव्यांचा तडजोडीने निपटारा केला जाईल. प्रलंबित दाव्यातील दोन्ही पक्षकार किंवा त्यांचे वकील संयुक्तपणे 'प्रपत्र-अ' मधील विहित नमुन्यात तडजोडीसाठी अर्ज सादर करतील. प्राप्त अर्जांची छाननी करून दोन्ही पक्षांच्या इच्छेनुसार कायदेशीर तडजोडनामा तयार केला जाईल. ठरवून दिलेल्या लोक अदालतीच्या दिवशी दोन्ही बाजूंच्या संमतीने अंतिम आदेश पारित करून प्रकरण कायमस्वरूपी निकाली काढले जाईल.

अभियानाचा लाभ राज्यातील शेवटच्या घटकांपर्यंत आणि शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा, यासाठी सर्व तहसील, उपविभाग व जिल्हाधिकारी कार्यालयांच्या संकेतस्थळांवर आणि फलकांवर माहिती प्रसिद्ध करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी कार्यालयांतही याचे फलक लावण्यात येतील. अभियानाच्या अंमलबजावणीचा त्रैमासिक अहवाल विभागीय आयुक्तांमार्फत शासनाला सादर केला जाणार आहे.

> सर्वसामान्य जनता आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणे हेच महात्मा फुले यांच्या विचारांचे मूळ सूत्र होते. लोक अदालतीच्या माध्यमातून दाव्यांवर कायमस्वरूपी तोडगा निघाल्यामुळे वकिलांचा खर्च, न्यायालयाचे खटले आणि मानसिक त्रास यातून नागरिकांची सुटका होईल.
>
> – चंद्रशेखर बावनकुळे महसूलमंत्री

# इराणचे अध्यक्ष भारत दौऱ्यावर?

## ब्रिक्स (BRICS) परिषदेला उपस्थित राहण्यासाठी मसूद पेझेश्कियान दिल्लीला येण्याची शक्यता

**महाईन्यूज । इराण**

**अमेरिका-इराणमधील संघर्षात दिवसेंदिवस वाढ होत असल्याचं पाहायला मिळत आहे. त्यामुळे मध्य पूर्वेत युद्धाचे ढग कायम आहेत. होर्मुझ सामुद्रधुनीत देखील तणाव असल्यामुळे कच्च्या तेलाच्या जागतिक व्यापाराला अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे याचा फटका जगातील अनेक देशांना बसत आहे. अमेरिका-इराणमधील हे युद्ध कधी थांबेल? या संघर्षावर ठोस तोडगा कधी निघेल? याबाबत संभ्रम कायम आहे.**



अमेरिका-इराण युद्धात आतापर्यंत इराणचं सर्वाधिक नुकसान झालं आहे. इराणमधील काही दिग्गज नेत्यांसह प्रमुख लष्करी अधिकारी आणि शेकडो नागरिकांना या युद्धात आपला जीव गमवावा लागला आहे. अशी परिस्थिती असतानाही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे दररोज वेगवेगळे वक्तव्य करत इराणला धमकी देत आहेत. या सर्व घडामोडी दरम्यानच आता इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान हे लवकरच भारत दौऱ्यावर येण्याची शक्यता आहे.

नवी दिल्लीत होणाऱ्या ब्रिक्स (BRICS) परिषदेला उपस्थित राहण्यासाठी मसूद पेझेश्कियान हे सप्टेंबरमध्ये नवी दिल्लीला येण्याची शक्यता आहे. या दौऱ्यादरम्यान मसूद पेझेश्कियान आणि पंतप्रधान मोदी यांची भेट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अमेरिका-इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर मसूद पेझेश्कियान यांचा हा दौरा महत्त्वपूर्ण ठरण्याची शक्यता आहे. या संदर्भातील वृत्त सूत्रांच्या हवाल्याने इंडिया टुडेने दिलं आहे.

मसूद पेझेश्कियान यांचा हा दौरा महत्त्वपूर्ण मानला जात आहे. कारण भारत २०२६ मधील १८ व्या ब्रिक्स परिषदेचं यजमानपद भूषवणार आहे. भारताने २०२६ च्या सुरुवातीला ब्राझीलकडून ब्रिक्सचं अध्यक्षपद स्वीकारलं होतं. तसेच ऑक्टोबर २०२४ मध्ये रशियातील कझान या ठिकाणी झालेल्या ब्रिक्स परिषदेदरम्यान पेझेश्कियान यांनी पंतप्रधान मोदी यांची भेट घेतली होती. तेव्हा या दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय आणि प्रादेशिक मुद्द्यांवर चर्चा केली होती.

जूनच्या सुरुवातीला ब्रिक्स देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीसाठी इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची भारतात आले होते. तेव्हा झालेल्या बैठकीनंतर दिल्लीत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना अराघची यांनी जागतिक स्तरावर शांतता प्रस्थापित करणारा देश म्हणून भारताचा वाढता प्रभाव अधोरेखित केला होता. तसेच पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थिती निवळण्यासाठी भारतही मोठी भूमिका बजावू शकतो असं म्हटलं होतं.

दरम्यान, सध्याच्या संकटावर कोणताही लष्करी उपाय नाही आणि वाटाघाटींद्वारे तोडगा काढणं हाच एकमेव व्यवहार्य मार्ग आहे, असं अराघची यांनी म्हटलं होतं. होर्मुझ सामुद्रधुनीच्या भागात सुरक्षेचे रक्षक म्हणून आपलं ऐतिहासिक कर्तव्य इराण सदैव पार पाडेल, असंही अराघची यांनी स्पष्ट केलं होतं.

### भारताची निर्णायक भूमिका?

अमेरिका-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर मसूद पेझेश्कियान यांचा भारत दौरा झाल्यास दोन्ही देशांच्या संबंधांना नवी दिशा मिळण्याची शक्यता आहे. BRICS परिषदेदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि पेझेश्कियान यांच्यात पश्चिम आशियातील तणाव, ऊर्जा सुरक्षा आणि प्रादेशिक स्थैर्याबाबत महत्त्वपूर्ण चर्चा होऊ शकते. भारताने नेहमीच संवाद आणि राजनैतिक मार्गाने संघर्ष सोडवण्यावर भर दिला आहे. त्यामुळे इराणच्या राष्ट्राध्यक्षांचा संभाव्य भारत दौरा आंतरराष्ट्रीय पातळीवरही महत्त्वाचा ठरू शकतो. विशेषतः युद्धजन्य परिस्थितीत भारताची संतुलित भूमिका चर्चेचा केंद्रबिंदू ठरण्याची शक्यता आहे.

# पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत स्वातंत्र्यदिनी उलगडणार ऑपरेशन सिंदूरचा थरार

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**काश्मीरमधील पहलगाम येथील बैसरन खोऱ्यात २२ एप्रिल २०२५ रोजी अतिरेक्यांनी भीषण हल्ला केला. बैसरनच्या हिरवळीवर कुटुंबासह पर्यटनाचा आनंद घेणाऱ्या निष्पाप नागरिकांवर धर्म विचारून गोळीबार करण्यात आला. ज्यामध्ये २६ निरपराध नागरिक मारले गेले. या हल्ल्याची माहिती पंतप्रधान मोदींना जेव्हा पहिल्यांदा कळली, तेव्हा त्यांची पहिली प्रतिक्रिया काय होती? याची माहिती आता राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी दिली आहे.**




पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी भारतीय सैन्यदलाने 'ऑपरेशन सिंदूर' राबवले होते. या ऑपरेशनमधून पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाचे कंबरडे मोडण्यात आले. पाकिस्तानच्या भूमीत जाऊन भारतीय लष्कराने दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले. या ऑपरेशन सिंदूरवर डिस्कव्हरी वृत्तवाहिनीकडून माहितीपट तयार केला जात आहे. या माहितीपटात अजित डोवाल यांनी मुलाखत दिली असून यात त्यांनी पंतप्रधान मोदींच्या पहिल्या प्रतिक्रियेची माहिती दिली.

अजित डोवाल यांच्यासह या माहितीपटात प्रमुख नेते, ऑपरेशन सिंदूरशी निगडित लष्कर आणि सुरक्षा दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्याही प्रतिक्रिया घेण्यात आल्या आहेत.

या माहितीपटाचा काही भाग सोशल मीडियावर शेअर करण्यात आला आहे. ज्यात अजित डोवाल म्हणाले की, पंतप्रधान मोदींना हल्ल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडला आणि ते भारतात परतले. त्यांनी सर्वात आधी हल्ला कसा झाला, कुणी केला? याची माहिती मागितली. पंतप्रधान मोदी भारतात परत येताच परराष्ट्र सचिव विमानतळावर भेटले. आम्ही विमानतळावरच यासंबंधीची बैठक घेतली. पंतप्रधानांनी सुरुवातीला सर्व माहिती जाणून घेतली. त्यानंतर त्यांचा पहिला प्रश्न मला होता. ते म्हणाले, "हे कुणी केले? यासाठी जबाबदार कोण?" अजित डोवाल पुढे म्हणाले, पंतप्रधान मोदींनी त्याच बैठकीत स्पष्ट केले की, भारत या हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्या लोकांना शोधून त्यांच्यावर कारवाई करेल. आणखी एका व्हिडीओत अजित डोवाल यांनी म्हटले की, आम्ही हल्ल्याला जबाबदार असलेल्यांना शोधून त्यांच्यावर जोरदार कारवाई केली. "ते कुठेही लपलेले असोत. आकाश, पाताळ, जमिनीवर कुठेही असले तरी आम्ही त्यांना शोधून काढू आणि सोडणार नाही", असे विधान अजित डोवाल करताना दिसून आले.


### ऑपरेशन सिंदूर सुरूच राहणार

ऑपरेशन सिंदूर अजूनही सुरूच आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले होते. या वाक्याचा अर्थही अजित डोवाल यांनी सविस्तर सांगितला. ते म्हणाले, "जेव्हा पंतप्रधान मोदी ऑपरेशन सिंदूर सुरूच असल्याचे सांगतात. तेव्हा याचा अर्थ असा की, जोपर्यंत शेवटचा दहशतवादी मारला जात नाही तोपर्यंत हा लढा सुरूच राहील, असे स्पष्ट संकेत त्यांनी दिले आहेत." ऑपरेशन सिंदूरनंतर देशाला संबोधित करत असताना पंतप्रधान मोदी यांनी म्हटले होते की, रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही. यातून त्यांनी पाकिस्तानला स्पष्ट संदेश दिला होता.

# राणी झाली भावूक!



लोकप्रिय बॉलिवूड अभिनेत्री राणी मुखर्जीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. मेलबर्न येथे आयोजित इंडियन फिल्म फेस्टिव्हल ऑफ मेलबर्न (IFFM) मध्ये राणीला तिच्या दमदार अभिनयासाठी आणि भारतीय चित्रपटसृष्टीतील उल्लेखनीय योगदानाबद्दल विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार स्वीकारताना राणी भावुक झाल्याचे पाहायला मिळाले. पुरस्कार स्वीकारल्यानंतर राणीने आपल्या भावना व्यक्त केल्या. ती म्हणाली, “माझ्या चित्रपटांमधील भूमिका केवळ प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यापुरत्या मर्यादित राहिल्या नाहीत, तर प्रत्येक पात्राने एक चांगली व्यक्ती बनण्यासही शिकवले. एका तरुण मुलीच्या रूपात चित्रपटसृष्टीत प्रवेश करताना आपले काम एक दिवस सातासमुद्रापार पोहोचेल, याची कधी कल्पनाही केली नव्हती.” असे सांगताना ती भावूक झाली होती. ऑस्ट्रेलियातील प्रेक्षकांनी भारतीय चित्रपटसृष्टीला आणि तिलाही नेहमीच भरभरून प्रेम व आदर दिल्याचे राणीने आवर्जून नमूद केले. तिच्या मते, चित्रपट हे असे माध्यम आहे जे जगभरातील लोकांना एकमेकांशी जोडण्याचे काम करते, कारण मानवी भावनांना कोणत्याही पासपोर्ट किंवा व्हिसाची गरज नसते. आपल्या तीन दशकांच्या प्रवासाकडे पाहताना राणीने पडद्यावर सशक्त आणि विविधांगी स्त्री व्यक्तिरेखा साकारण्याची संधी मिळाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तिच्या पात्रांनी मनमोकळेपणाने हसणे, मनापासून प्रेम करणे, अन्यायाविरुद्ध निर्भयपणे लढणे आणि स्वतःवरील विश्वास कायम ठेवणे शिकवले.



# प्रीती झिंटाने शेअर केला खास लूक

अभिनेत्री प्रीती झिंटा सध्या तिच्या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. सनी देओल, प्रीती झिंटा, शबाना आझमी आणि अली फजल यांसारख्या कलाकारांची महत्त्वाची भूमिका असलेला ‘बंटवारा 1947’ हा चित्रपट 14 ऑगस्ट रोजी सिनेमागृहात प्रदर्शित झाला आहे. चित्रपटाच्या रिलीजआधी प्रीती झिंटाने सोशल मीडियावर एक खास फोटो शेअर करत तिच्या भूमिकेशी जोडलेली आठवण चाहत्यांसोबत शेअर केली. प्रीतीने या चित्रपटात हमीदा नावाची व्यक्तिरेखा साकारली आहे. चित्रपटाच्या रिलीजच्या काही तास आधी तिने हमीदाच्या लूक टेस्टदरम्यान काढलेला ब्लॅक अँड व्हाइट फोटो सोशल मीडियावर पोस्ट केला. या फोटोसोबत तिने लिहिलेला भावनिक मजकूर चाहत्यांचे लक्ष वेधून घेत आहे. प्रीती झिंटाने आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये सांगितले की, चित्रपटाच्या रिलीजच्या आधी तिला त्या क्षणाकडे पुन्हा वळून पाहावेसे वाटले, जिथून तिच्या या भूमिकेचा प्रवास सुरू झाला. हमीदा या व्यक्तिरेखेचा पहिल्यांदा लूक टेस्टमध्ये अनुभव घेतल्याची आठवण तिने शेअर केली. या फोटोमध्ये प्रीती अगदी वेगळ्या अंदाजात दिसत आहे. तिच्या लूकमधून चित्रपटाच्या कथानकाची पार्श्वभूमीही जाणवते.

# ‘टॉक्सिक’च्या प्रमोशनमध्ये तारा सुतारियाचा रेट्रो जलवा

अभिनेत्री तारा सुतारिया सध्या तिच्या आगामी ‘टॉक्सिक’ या चित्रपटामुळे चर्चेत आहे. चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये ती वेगवेगळ्या लूकमध्ये चाहत्यांचे लक्ष वेधून घेत आहे. नुकतेच तिने सोशल मीडियावर काही खास फोटो शेअर केले असून, या फोटोंमध्ये तिचा रेट्रो अंदाज




पाहायला मिळत आहे. तिच्या या लूकची सध्या सोशल मीडियावर चर्चा होत आहे. ताराने काळ्या रंगाचा स्टायलिश आउटफिट परिधान करून काही फोटो शेअर केले आहेत. या लूकमध्ये जुन्या हॉलीवूड सिनेमांची झलक पाहायला मिळते. फोटो शेअर करताना तिने 50च्या दशकातील स्टाइलचा संदर्भ देणारे कॅप्शनही लिहिले आहे. त्यामुळे तिच्या या फोटोशूटला खास रेट्रो टच मिळाला आहे. ताराने या फोटोशूटसाठी काळ्या रंगाची फिटेड ड्रेस निवडली आहे. या ड्रेसमध्ये कॉर्सेट स्टाइल टॉप, स्वीटहार्ट नेकलाइन आणि स्ट्रॅपी डिझाइन पाहायला मिळते. ड्रेसची लांबी एंकलपर्यंत असून, त्यासोबत तिने मॅचिंग ग्लोव्ह्ज आणि हिल्स परिधान केल्या आहेत. तिच्या या संपूर्ण लूकमध्ये 50च्या दशकातील फॅशनची झलक दिसते. कपड्यांसोबतच तिची ज्वेलरी, हेअरस्टाइल आणि मेकअपही रेट्रो थीमला साजेसा ठेवण्यात आला आहे. ताराने आपल्या लूकला अधिक खास बनवण्यासाठी पर्लची स्टेटमेंट ज्वेलरी निवडली आहे. मोत्यांच्या दागिन्यांमुळे तिच्या काळ्या ड्रेसला एक क्लासिक टच मिळाला आहे. मेकअपसाठी तिने अतिशय सटल लूक ठेवला आहे. साध्या मेकअपमुळे तिच्या चेहऱ्यावरील नैसर्गिक लूक उठून दिसत आहे. हेअरस्टाइलमध्येही रेट्रो स्टाइलचा प्रभाव पाहायला मिळतो. फ्रंटला एका बाजूला केलेले केस आणि हाय हेअरस्टाइलमुळे तिचा लूक आणखी आकर्षक दिसत आहे. ताराने या फोटोशूटमध्ये काही ब्लॅक अँड व्हाइट फोटोही शेअर केले आहेत. एका फोटोमध्ये ती गॉगल्स घालून लो काउचवर बसून पोझ देताना दिसत आहे.



# अभिषेक पोरेलला जामीन नाकारला

## बलात्काराच्या आरोपाप्रकरणी १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**बंगाल आणि दिल्ली कॅपिटल्सचा क्रिकेटपटू अभिषेक पोरेल मोठ्या पेचात सापडला आहे. अभिषेक पोरेलवर बलात्काराच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती. त्याला आता जामीन नाकारण्यात आला असून १४ दिवसीय न्यायालयीन कोठडी ठोठावली आहे.**




शुक्रवारी, १४ ऑगस्ट रोजी चिनसुरा न्यायालयाने जामीन नाकारत १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत पाठवले. लग्नाचे आश्वासन देऊन लैंगिक संबंध ठेवणं आणि गैरवर्तन केल्याचा आरोप करणाऱ्या तक्रारीनंतर मोगरा पोलिसांनी त्याला अटक केली होती. पोरेलला यापूर्वी ११ ऑगस्ट रोजी न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्यानंतर न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली होती.

२३ वर्षीय यष्टिरक्षक फलंदाज पोरेल बंगाल संघाचा नियमित सदस्य असून आयपीएलमधील दिल्ली कॅपिटल्सकडूनही खेळतो. या प्रकरणाचा तपास २३ जूनपासून सुरू आहे. कर्नाटकात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या एका तरुणीने मोगरा पोलिस ठाण्यात त्याच्याविरोधात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, पोरेलने लग्नाचे आश्वासन देत तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले आणि नंतर गैरवर्तन केलं, असा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे बंगाल क्रिकेट आणि आयपीएल वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, अभिषेक पोरेल आणि तक्रार केलेली तरुणी गेल्या साडेतीन वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये होते. दोघांनी लग्न करण्याचा विचार केला होता आणि ते परदेशातही एकत्र जाऊन आले होते. सुमारे १८ महिन्यांपूर्वी दोघांमध्ये वाद झाला होता, ज्यामुळे पोलिसांपर्यंतही प्रकरण पोहोचलं होतं. मात्र त्या वेळी कोणतीही एफआयआर दाखल करण्यात आली नव्हती.

तपासादरम्यान पोलिसांनी पोरेलच्या चंदननगर येथील घरी अनेक वेळा भेट दिली, पण तो सापडला नाही. त्यानंतर तक्रार केलेल्या तरुणीने कलकत्ता उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयाने मोगरा पोलिसांना त्याला तात्काळ अटक करण्याचे आदेश दिले.

या आदेशानंतर पोरेलला कोलकात्यात अटक करण्यात आली आणि त्याच्याविरोधात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला. प्राथमिक पोलिस कोठडीची मुदत संपल्यानंतर आज त्याला पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आलं आणि पुढील सुनावणीपर्यंत न्यायालयीन कोठडीत पाठवण्याचे आदेश देण्यात आले.

### ब्लॅकमेलिंगचा आरोप

वृत्तांनुसार, बंगालचा क्रिकेटपटू अभिषेक पोरेल याने तक्रार केलेल्या तरुणीला ब्लॅकमेल केल्याचा आणि तिचे खासगी फोटो व व्हिडिओ सार्वजनिक करण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. पोलिसांनी त्याच्याविरोधात अजामीनपात्र कलमांखाली गुन्हा दाखल केला असून तपासाचा भाग म्हणून त्याला मोबाईल फोन, लॅपटॉप आणि इतर स्टोरेज उपकरणांसह इलेक्ट्रॉनिक साधने तपासासाठी जमा करावी लागणार असल्याचं सांगितलं आहे.

# "तू बांगलादेशामध्ये नाहीस", स्टार्क-हसनमध्ये भर मैदानात वाद

**महाईन्यूज** । बांगलादेश

**बांगलादेश संघाने ऑस्ट्रेलियाची कसोटीत घरच्या मैदानावर अवस्था बिकट केली आहे. पहिल्या कसोटीत सध्या बांगलादेश संघाचा दबदबा पाहायला मिळत आहे. पहिल्याच दिवशी बांगलादेशला १९८ धावांवर सर्वबाद करत कमालीची सुरूवात केली. यानंतर बांगलादेशने दुसरा संपूर्ण दिवस खेळून काढला आणि दुसऱ्या दिवसाअखेरीस बांगलादेशने १५३ धावांची आघाडी घेतली आहे. यादरम्यान ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क व बांगलादेशचा अष्टपैलू खेळाडू मेहदी हसन मिराज यांच्यात मैदानावर बाचाबाची झाली.**




ऑस्ट्रेलिया आणि बांगलादेश यांच्यात डार्विनमधील मैदानावर सुरू असलेल्या पहिल्या कसोटीच्या दुसऱ्या दिवसाच्या अखेरीस वातावरण तापलं. बांगलादेशच्या डावात मिचेल स्टार्क त्याच्या स्पेलमधील २१वं षटक टाकण्यासाठी आला होता. यादरम्यान दोन खेळाडूंमध्ये वाद झाला. मिचेल स्टार्क गोलंदाजी करत होता, तर मेहदी हसन मिराज स्ट्राईकवर होता.

मेहदी हसन मिराजने चेंडू सरळ खेळत एक धाव घेतली, पण धावताना तो चुकून खेळपट्टीच्या मधोमध गेला. स्टार्कच्या फॉलो-थ्रूमुळे त्याला उजव्या बाजूने धावण्याची संधी मिळाली नाही. यामुळे दोघांमध्ये शाब्दिक चकमक झाली. स्टार्क संतापलेल्या स्वरात त्याला बोलत होता, "खेळपट्टीवरून दूर हो! हा माझा फॉलो-थ्रू आहे, तुझा नाही," असं सांगत मिराजकडे बोट दाखवलं. हा संवाद स्टम्प माइकवर स्पष्ट ऐकू आला. परिस्थिती चिघळण्याची शक्यता दिसताच पंच कुमार धर्मसेना यांनी तत्काळ हस्तक्षेप करून दोन्ही खेळाडूंना शांत केलं.

मिराजने मात्र वाद वाढवण्याचा प्रयत्न केला नाही आणि त्याने पंच धर्मसेना यांना सांगितलं, "मला दिसलं नाही, मी पाहिलंच नाही." या घटनेनंतर काही क्षण मैदानावर तणावाचं वातावरण निर्माण झालं, मात्र पंचांच्या हस्तक्षेपामुळे परिस्थिती नियंत्रणात राहिली. पंच कुमार धर्मसेना मेहदी हसन मिराजशी बोलत असतानाही मिचेल स्टार्कचा राग पूर्णपणे शांत झालेला दिसत नव्हता.

तो मिराजकडे पाहत म्हणाला, "तू आता बांगलादेशमध्ये नाहीयस, समजलास?" स्टम्प माइकवर ऐकू आलेल्या या टिप्पणीमुळे मैदानावरील वातावरण आणखी तापलं. स्टार्कची ही प्रतिक्रिया स्पष्टपणे नाराजी व्यक्त करणारी होती, तर मिराजने पुन्हा कोणताही वाद वाढवण्याचा प्रयत्न केला नाही. पंच धर्मसेना यांनी दोन्ही खेळाडूंना समजावत परिस्थिती नियंत्रणात ठेवली, पण स्टार्कच्या या वक्तव्याची चर्चा सोशल मीडियावर आणि क्रिकेट वर्तुळात मोठ्या प्रमाणावर सुरू झाली आहे. हा व्हीडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

मात्र, या वादात मेहदी हसन मिराजला ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पॉंटिंग याचा पाठिंबा मिळाला. चॅनल सेव्हनच्या समालोचनादरम्यान पॉंटिंगने आपलं मत व्यक्त करत म्हटलं, "मला वाटत नाही की त्याने (मिराजने) हे मुद्दाम केलं गेलं होतं." दरम्यान, त्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर हसन महमूदने चेंडू परत गोलंदाजाकडे बचावात्मक खेळला. स्टार्कने चेंडू उचलला आणि पुन्हा मिराजला काहीतरी बोलताना दिसला.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। शनिवार ।
दि. 15 ऑगस्ट 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# वाहतूक कोंडीमुक्त PMR साठी एकत्रित प्रयत्नांचा संकल्प

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची महत्त्वपूर्ण बैठक

## वाहतूक प्रश्नांवर विविध संघटनांसोबत सविस्तर चर्चा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार पाठपुरावा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**हिंजवडी आयटी हब तसेच तळेगाव-चाकण-खेड औद्योगिक पट्ट्यातील वाढती वाहतूक कोंडी आणि पायाभूत सुविधांच्या प्रश्नांवर आता संघटितपणे पाठपुरावा करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारातून 'अनलॉग हिंजवडी' अभियान, पिंपरी-चिंचवड गृहनिर्माण सोसायटी महासंघ (फेडरेशन), फोरम फॉर आयटी एम्प्लॉई, चाकण एमआयडीसी उद्योजक संघटना आणि ट्रॅफिकमुक्त चाकण कृती समितीच्या प्रतिनिधींसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली.**



हिंजवडी आयटी हब आणि तळेगाव-चाकण-खेड औद्योगिक पट्टा हा पुणे महानगर प्रदेशाच्या आर्थिक विकासाचा महत्त्वाचा कणा आहे. मात्र, अपुऱ्या रस्ते सुविधा, वाढती वाहनसंख्या, भूसंपादनातील अडथळे, अतिक्रमणे आणि प्रशासकीय समन्वयाचा अभाव यामुळे या परिसरातील वाहतूक कोंडी दिवसेंदिवस गंभीर होत आहे. त्यामुळे उद्योग, रोजगार आणि गुंतवणुकीवर परिणाम होऊ नये, यासाठी दीर्घकालीन आणि एकत्रित उपाययोजनांची गरज असल्याचे आमदार लांडगे यांनी स्पष्ट केले.

जून २०२५ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या प्रश्नावर बैठक नियोजित करण्यात आली होती. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी या विषयासाठी विभागीय आयुक्तांची 'नोडल अधिकारी' म्हणून नियुक्ती केली होती. त्यानंतर वाहतूक सुसूत्रीकरणासाठी प्रशासनाकडून काही उपाययोजनांना सुरुवात झाली. मात्र, भूसंपादन, अतिक्रमणे, तांत्रिक अडचणी आणि प्रशासकीय पातळीवरील संथगतीमुळे अनेक कामांना अपेक्षित वेग मिळाला नसल्याचे बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आले.

या बैठकीस सचिन लोंढे, जयदेव अक्कलकोटे, पवनजीत माने, प्रशांत टोपे, सचिन सिद्धे, कुणाल कड, प्रतिक जाधव, निखिल कदम, प्रशांत गोरे, निवास माने आदी उपस्थित होते.

### मुख्यमंत्र्यांसोबत पुन्हा बैठक घेणार

या बैठकीतील प्रमुख मुद्दे घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत पुन्हा बैठक घेण्याचा निर्धार करण्यात आला. प्रस्तावित रस्त्यांसाठी आवश्यक भूसंपादनाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणे, वाहतूक पोलिस व वॉर्डनचे मनुष्यबळ वाढविणे, तसेच ग्रामपंचायत आणि अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समन्वय साधून एकत्रित पाठपुरावा करण्यावरही भर देण्यात आला.

### 'इंडस्ट्रियल टाउनशिप'चा व्यापक दृष्टिकोन

हिंजवडीसह तळेगाव-चाकण-खेड औद्योगिक क्षेत्राचा केवळ वाहतूक प्रश्न सोडविण्यापुरता विचार न करता, त्याचा 'इंडस्ट्रियल टाउनशिप' म्हणून नियोजनबद्ध विकास करण्याची गरज आहे. उद्योगांना आवश्यक रस्ते, सार्वजनिक वाहतूक, वीज, पाणी, नागरी सुविधा आणि वाहतूक व्यवस्थापन यांचा एकात्मिक आराखडा तयार झाल्यास या क्षेत्रातील उद्योग आणि रोजगाराला मोठी चालना मिळू शकते, असा मुद्दा बैठकीत मांडण्यात आला.

### बैठकीत या मुद्यावर झाली चर्चा..

1. आयटी व औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक कोंडीवर ठोस उपाययोजना निश्चित करणे.
2. नोडल अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली अराजकीय समन्वय समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव.
3. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत पुन्हा बैठक घेणे.
4. सुरू असलेल्या कामांचा दर्जा आणि वेग याबाबत नियमित 'क्वालिटी कंट्रोल' व पाठपुरावा.
5. प्रस्तावित रस्त्यांसाठी भूसंपादन प्रक्रियेला गती देणे.
6. वाहतूक पोलीस व वॉर्डनचे मनुष्यबळ वाढविण्याचा पाठपुरावा.
7. ग्रामपंचायत व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समन्वय साधून एकत्रित कृती आराखडा तयार करणे.

"हिंजवडी आयटी हब आणि तळेगाव-चाकण-खेड औद्योगिक पट्टा हा केवळ पुणे जिल्ह्याचा नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासासाठी महत्त्वाचा आहे. वाहतूक कोंडीमुळे उद्योग, कामगार आणि नागरिकांना त्रास होणार असेल, तर ही परिस्थिती स्वीकारता येणार नाही. शासन, प्रशासन, उद्योजक, नागरिक आणि विविध संघटनांना सोबत घेऊन ठोस, कालबद्ध आणि परिणामकारक उपाययोजना करण्यासाठी आमचा सातत्यपूर्ण पाठपुरावा राहील. पुणे महानगर प्रदेश (PMR) ला वाहतूक कोंडीमुक्त आणि उद्योगस्नेही बनविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचा हा संकल्प आहे.

- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

### अराजकीय समिती स्थापण्याचा प्रस्ताव

वाहतूक प्रश्न हा कोणत्याही एका पक्षाचा किंवा संस्थेचा विषय नसून नागरिक, कामगार, उद्योजक आणि प्रशासन या सर्वांशी संबंधित असल्याने नोडल अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली अराजकीय समन्वय समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव पुढे आला. या समितीच्या माध्यमातून प्रलंबित कामांचा नियमित आढावा, कामाचा वेग, दर्जा आणि आवश्यक भूसंपादन यांचा पाठपुरावा करण्याचे निश्चित करण्यात आले.



# महापालिका कर्मचाऱ्यांची दिवाळी आणखी गोड

## सानुग्रह अनुदानात ५ हजारांची वाढ, 8.33 टक्के प्रथा बोनस कायम; पाच वर्षांचा करार

महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील अधिकारी, कर्मचारी तसेच निवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी यंदाची दिवाळी अधिक आनंदाची ठरणार आहे. दरवर्षी देण्यात येणाऱ्या 8.33 टक्के प्रथा बोनससोबत सानुग्रह अनुदानात ५ हजार रुपयांची वाढ करून ते २५ हजारांऐवजी ३० हजार रुपये देण्याचा निर्णय स्थायी समितीने घेतला आहे. तसेच, पुढील पाच वर्षांसाठी म्हणजेच सन 2025-26 ते 2029-30 या कालावधीसाठी बोनस व सानुग्रह अनुदान देण्याचा करार करण्यासही स्थायी समिती सभेचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी मान्यता दिली आहे.**




स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या पुढाकाराने घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे महापालिका कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. कर्मचारी महासंघाने दिवाळी प्रथा बोनस व सानुग्रह अनुदानाबाबत पाच वर्षांचा करार करण्याची मागणी केली होती. त्यानुसार कामगार कल्याण मंडळाने प्रस्ताव स्थायी समिती सभेपुढे मांडला. या प्रस्तावावर चर्चा करताना स्थायी समितीने केवळ प्रस्तावाला मंजुरी देण्यापुरते मर्यादित न राहता सानुग्रह अनुदानाची रक्कम २५ हजारांवरून ३० हजार रुपये करण्याची उपसूचना मंजूर केली. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या हिताचा निर्णय घेत त्यांच्या आर्थिक लाभात वाढ करण्याची भूमिका अध्यक्ष बारणे यांनी घेतली. उपसूचनेसह हा प्रस्ताव आता अंतिम मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यात आला आहे.

महापालिका आस्थापनेवरील सर्व अधिकारी व कर्मचारी, तसेच शिक्षण विभाग आणि वैद्यकीय विभागातील अधिकारी-कर्मचारी यांच्यासह निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनाही प्रथा बोनस व सानुग्रह अनुदानाचा लाभ दिला जातो. पाच वर्षांचा करार झाल्यास दरवर्षी बोनस व अनुदानाबाबतची अनिश्चितता कमी होऊन कर्मचाऱ्यांना आर्थिक नियोजन करता येणार आहे. महापालिकेत सहा हजारांहून अधिक अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. मागील वर्षी दिवाळी बोनस व संबंधित खर्चासाठी महापालिकेने सुमारे ६२ कोटी रुपये खर्च केले होते. कर्मचा-यांच्या हितासाठी सानुग्रह अनुदानात भरघोस वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### कर्मचाऱ्यांच्या हक्काच्या लाभात कपात नाही

स्थायी समिती सभेचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांच्या भूमिकेमुळे कर्मचारी हिताला प्राधान्य देत बोनसची परंपरा कायम ठेवण्याबरोबरच सानुग्रह अनुदानात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महापालिका कर्मचाऱ्यांच्या कामाचा आणि योगदानाचा विचार करून त्यांच्या आर्थिक हिताचे संरक्षण करण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. पाच वर्षांचा करार आणि सानुग्रह अनुदानातील वाढ यामुळे महापालिका कर्मचाऱ्यांना दिवाळीच्या काळात अतिरिक्त आर्थिक आधार मिळणार असून, पुढील काही वर्षांसाठी लाभाची निश्चितता निर्माण होणार आहे.

# शिक्षण स्वतःला सक्षम करण्याचे माध्यम; अंकिता पाटील ठाकरे

महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड

**शिक्षण हे स्वतःला सक्षम करण्याचे आणि समाजासाठी सकारात्मक योगदान देण्याचे माध्यम आहे. तंत्रज्ञान आणि सोशल मीडियाचा वापर मनोरंजन शिवाय ज्ञान, कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी करावा. तसेच व्यावसायिक जीवनात पदार्पण केल्यानंतर समाजासाठी योगदान देण्याची भावना जोपासावी असे मार्गदर्शन पुणे जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समिती अध्यक्ष आणि इंडियन शुगर मिल्स असोसिएशन सदस्य अंकिता पाटील ठाकरे यांनी केले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ मध्ये स्कूल ऑफ फार्मसी, स्कूल ऑफ सायन्सेस, पुणे डिझाईन स्कूल आणि पुणे स्कूल ऑफ मीडिया अँड कम्युनिकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा 'दीक्षारंभ २०२६-२७' या स्वागत सोहळा ठाकरे बोलत होत्या. यावेळी ज्येष्ठ चित्रपट अभिनेते रझा मुराद, स्वतंत्र सार्वजनिक आरोग्य सल्लागार डॉ. शंकर दापेकर, पीसीइटी चे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीयू चे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, पीसीयूचे संचालक, प्रशिक्षण व प्लेसमेंट डॉ. शितलकुमार रवंदळे, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व पालक आदी उपस्थित होते. यावेळी 'स्टुडंट मॅन्युअल' चे अनावरण करण्यात आले.

प्रसिद्ध अभिनेते रझा मुराद यांनी सांगितले की, प्रतिभा संपन्न व्यक्तिमत्व विकसित होण्यासाठी स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवून आत्मविश्वासाने मेहनत घेतली व कामात सातत्य ठेवले तर प्रत्येकाला योग्य संधी नक्की मिळते.

डॉ. शंकर दापेकर यांनी सांगितले की, आरोग्यदायी जीवनशैली साठी नियमित व्यायाम, पुरेशी झोप, योग्य आहार या त्रिसूत्रांचे पालन करावे.

डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले की, पीसीयू मध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन, नवोपक्रम, उद्योगाभिमुख शिक्षण आणि सर्वांगीण विकासासाठी आवश्यक संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता असतात. त्याचा उपयोग शैक्षणिक, कौशल्य विकासा बरोबर करिअर साठी करावा. पीसीयू च्या ट्रेनिंग व प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून अनेक करिअर संधी आणि मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाते.

डॉ. संतोष सोनवणे यांनी सांगितले की, आंतरराष्ट्रीय सहकार्य, कोरियन उद्योगांशी संपर्क, विविध परदेशी भाषा शिकण्याच्या संधी, सेंटर ऑफ एक्सलन्स, एआय आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील संधींचा लाभ घ्यावा.

स्वागत डॉ. गिरीश देसाई, सूत्र संचालन अभिषेक चौधरी आणि आभार ऋचू कुटियाला यांनी मानले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, पीसीयू नियामक मंडळ सदस्य उद्योजक अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

# पिंपरीत 'हर घर तिरंगा' अभियानाचा देशभक्तीमय उत्साह

## विद्यार्थ्यांच्या हाती तिरंगा; भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांची प्रमुख उपस्थिती

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशभर राबविण्यात येत असलेल्या 'हर घर तिरंगा' अभियानाच्या निमित्ताने पिंपरी-चिंचवड शहरातही देशभक्तीचा उत्साह पाहायला मिळत आहे. याच अभियानातून प्रेरणा घेत भाजप महिला मोर्चा पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने संत तुकाराम नगर येथील भारतीय जैन संघटना संचलित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना मोफत राष्ट्रध्वजांचे वाटप करण्यात आले.**



भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा सौ. सुजाताताई पालांडे यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमास भाजप पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या हाती तिरंगा सुपूर्द केला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेम, राष्ट्रध्वजाचा सन्मान आणि देशाप्रती असलेल्या कर्तव्याची जाणीव करून दिली.

यावेळी बोलताना शत्रुघ्न (बापू) काटे म्हणाले, "राष्ट्रध्वज हा आपल्या देशाचा अभिमान, अस्मिता आणि भारताच्या वाढत्या सामर्थ्याचे प्रतीक आहे. 'हर घर तिरंगा' हे केवळ एक अभियान नसून प्रत्येक नागरिकाच्या मनात देशप्रेमाची ज्योत प्रज्वलित करणारी राष्ट्रीय चळवळ आहे. आज या बालचमूंच्या हातात दिलेला तिरंगा उद्या प्रत्येक घरावर अभिमानाने फडकताना दिसेल. शालेय वयातच विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्तीचे संस्कार रुजविण्याचा महिला मोर्चाचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे." तिरंगा हातात मिळताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि अभिमानाचे भाव उमटले. यावेळी शाळा परिसर 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' आणि 'हर घर तिरंगा'च्या घोषणांनी दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने राष्ट्रध्वज हातात घेत देशभक्तीचा जयघोष केला.

या कार्यक्रमास भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा सौ. सुजाताताई पालांडे, संघटन सरचिटणीस मोरेश्वरभाऊ शेडगे, सरचिटणीस मधुकरभाऊ बच्चे, मनोजराव ब्राम्हणकर, भारतीय जैन संघटनेचे पदाधिकारी, शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद, कर्मचारी तसेच शेकडो विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या हातातील तिरंगा आणि त्यांच्या ओठांवरील देशभक्तीच्या घोषणा यामुळे संत तुकाराम नगर परिसरात स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रप्रेमाचा उत्साह अनुभवायला मिळाला.

> राष्ट्रध्वज हा प्रत्येक भारतीयाच्या अभिमानाचा, स्वाभिमानाचा आणि राष्ट्राच्या अस्मितेचा प्रतीक आहे. 'हर घर तिरंगा' अभियानाच्या माध्यमातून देशप्रेमाची भावना प्रत्येक घरापर्यंत आणि प्रत्येक मनापर्यंत पोहोचत आहे. विद्यार्थ्यांच्या हातात आज दिलेला तिरंगा हा केवळ ध्वज नसून, त्यांच्या मनात राष्ट्रभक्तीचे संस्कार रुजविण्याचे माध्यम आहे. देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी भावी पिढीमध्ये राष्ट्रप्रेम, एकता आणि कर्तव्यभावनेची जाणीव निर्माण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.
>
> **- शत्रुघ्न (बापू) काटे, शहराध्यक्ष, भाजप पिंपरी-चिंचवड.**

# पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना शोकसभेत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पिंपरी येथे काल (१२ ऑगस्ट २०२६) सायंकाळी माजी राज्यपाल आणि डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण समूहाचे संस्थापक पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील (दादा) (ज्ञानदेव यशवंतराव पाटील) यांच्या शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून पाटील परिवाराचे सांत्वन केले व दिवंगत आत्म्यास भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.**



पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील (ज्ञानदेव यशवंतराव पाटील) दादांच्या निधनाने शिक्षणविश्वावर तीव्र शोककळा पसरली असून, एका महान युगाचा अंत झाला आहे. ज्ञान, संस्कार, दूरदृष्टी आणि मानवतेचा अखंड दीप प्रज्वलित ठेवणारे एक थोर शिक्षणमहर्षी म्हणून दादा ओळखले जात. वयाच्या ९० व्या वर्षी त्यांचे निधन झाल्याने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे.

पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांनी केवळ शैक्षणिक संस्थांचे जाळे उभे केले नाही, तर लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार दिला, नैतिक मूल्यांची जोपासना केली आणि शिक्षणाला खऱ्या अर्थाने समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनवले. त्यांचे दूरदर्शी नेतृत्व, साधेपणा, मानवतावादी दृष्टिकोन आणि शिक्षणाप्रती असलेली अखंड निष्ठा येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी सदैव मार्गदर्शक ठरेल.

पाटील परिवाराकडून सांत्वनपर भेटीचा स्वीकार: याप्रसंगी डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या प्र-कुलपती व ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटीच्या कुलपती व अध्यक्षा डॉ. सौ. भाग्यश्री पी. पाटील, डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी (अभिमत विद्यापीठ), कोल्हापूरचे कुलपती व अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष व आमदार श्री. सतेज डी. पाटील, ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटीचे प्र-कुलपती व डॉ. डी. वाय. पाटील युनीटेक सोसायटीचे सचिव डॉ. सोमनाथ पी. पाटील, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू व डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटीच्या सचिव डॉ. सौ. स्मिता जाधव, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटी, पुणेचे विश्वस्त व खजिनदार डॉ. यशराज पी. पाटील यांच्यासह पाटील परिवारातील सदस्यांनी उपस्थितांच्या सांत्वनपर भेटीचा स्वीकार केला.

या शोकसभेला शैक्षणिक, औद्योगिक, राजकीय, साहित्यिक, सामाजिक, क्रीडा, कृषी, अध्यात्मिक, शासकीय व वैद्यकीय क्षेत्रांतील असंख्य मान्यवर उपस्थित होते. तसेच शिक्षण समूहातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी संपूर्ण विद्यापीठ सभागृह शोकाकुल वातावरणात बुडून गेले होते. उपस्थितांनी दादांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या पवित्र स्मृतीस अत्यंत नम्रभावाने अभिवादन केले. उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून शोक व्यक्त केला. त्यानंतर पवित्र गीता पठण, प्रार्थना आणि दादांच्या जीवनप्रवासावर आधारित भावस्पर्शी चित्रफीत (Short Film) दाखवली जात असताना सभागृहातील वातावरण पूर्णपणे गहिवरून गेले होते; उपस्थितांचे मन हेलावून गेले, डोळे अश्रूंनी पाणावले.

> दादा हे केवळ एका शैक्षणिक समूहाचे संस्थापक नव्हते, तर आम्हा सर्वांचे भक्कम आधारस्तंभ आणि मार्गदर्शक होते. 'शिक्षणातून समाजविकास' हा त्यांनी दिलेला मंत्र आणि त्यांनी जपलेली मूल्ये हीच आमची खरी पुंजी आहे. त्यांनी उभारलेला हा ज्ञानाचा वटवृक्ष असाच बहरत ठेवणे आणि त्यांनी दाखवलेल्या मार्गावर निष्ठेने चालणे, हीच त्यांना दिलेली खरी आणि भावपूर्ण श्रद्धांजली ठरेल.
>
> **- डॉ. पी. डी. पाटील, कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे.**

> दादांचे संपूर्ण आयुष्य हे मानवता, वात्सल्य आणि निरंतर सेवेचे प्रतीक होते. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचावी, ही त्यांची धडपड असायची. त्यांची तीच दूरदृष्टी, साधेपणा आणि आपुलकी आजही आपल्या सर्वांच्या मनात जिवंत आहे. दादांचे विचार आणि त्यांचे आशीर्वाद कायम आपल्या पाठीशी राहतील.
>
> **- डॉ. सौ. भाग्यश्री पी. पाटील, प्र-कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ व अध्यक्षा, ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी**

# यशवंतनगरातील सर्व्हिस रोडची दुरुस्ती

## चेंबरलगत दबलेला रस्ता आणि खड्ड्यांची केली डागडुजी; नागरिकांना दिलासा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**प्रभाग क्रमांक ९ मधील यशवंतनगर परिसरातील सर्व्हिस रोडवरील खराब झालेल्या रस्त्याची अखेर दुरुस्ती करण्यात आली आहे. चेंबरच्या बाजूचा रस्ता काही ठिकाणी दबला होता, तर काही ठिकाणी मोठे खड्डे पडल्याने नागरिकांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत होता.**





“ नागरिकांची सुरक्षित आणि सुलभ ये-जा ही आमची प्राथमिकता आहे. यशवंतनगरातील सर्व्हिस रोडवरील खड्डे आणि चेंबरलगत दबलेल्या रस्त्यामुळे नागरिकांना होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन तातडीने दुरुस्तीचे काम करून घेतले आहे. प्रभागातील मूलभूत सुविधांबाबत नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन त्या सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. नागरिकांना चांगल्या सुविधा मिळेपर्यंत हा पाठपुरावा असाच सुरू राहील.

- डॉ. वैशाली घोडेकर, मा. महापौर, नगरसेवक.

यशवंतनगर परिसरातील नागरिकांना होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन मा. महापौर व नगरसेविका डॉ. वैशाली घोडेकर लोंढे यांनी संबंधित यंत्रणेकडे पाठपुरावा केला. त्यानंतर सर्व्हिस रोडवरील खड्डे बुजवून तसेच दबलेल्या भागाची दुरुस्ती करून रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत करण्यात आला.

या कामामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, वाहनचालकांचीही गैरसोय दूर झाली आहे. पावसाळ्यात रस्त्यांची अवस्था आणखी खराब होऊ नये, यासाठी आवश्यक त्या ठिकाणी वेळेत दुरुस्तीची कामे करण्यात यावीत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

“नागरिकांना दैनंदिन ये-जा करताना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी प्रभागातील मूलभूत सुविधांकडे सातत्याने लक्ष दिले जात आहे. यशवंतनगरातील सर्व्हिस रोडवरील खड्डे आणि दबलेला रस्ता दुरुस्त करून नागरिकांची गैरसोय दूर करण्यात आली आहे. प्रभागातील अन्य समस्या देखील प्राधान्याने सोडविण्यासाठी पाठपुरावा सुरू राहील,” असे डॉ. वैशाली घोडेकर लोंढे यांनी सांगितले.



## समाजहिताच्या उपक्रमांतून गणेश मंडळांचा आदर्शवत सहभाग : उपमहापौर

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**



गणेशोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक परंपरेसोबतच सामाजिक प्रबोधन आणि विधायक उपक्रमांना चालना देण्याचे काम शहरातील गणेश मंडळांकडून केले जात आहे. विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये सकारात्मक संदेश पोहोचविणाऱ्या गणेश मंडळांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे, असे मत उपमहापौर शर्मिला बाबर यांनी व्यक्त केले.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या वतीने पिंपरी-चिंचवड शहरातील गणेशोत्सव मंडळांसाठी आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात त्या बोलत होत्या. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात झालेल्या या कार्यक्रमात विविध गणेश मंडळांना त्यांच्या उल्लेखनीय व विधायक कार्यासाठी गौरविण्यात आले.

गणेशोत्सव हा केवळ उत्सवापुरता मर्यादित न राहता सामाजिक परिवर्तनाचे माध्यम ठरावा, यासाठी मंडळांनी सामाजिक प्रश्नांवर जनजागृती करणारे उपक्रम राबविणे गरजेचे आहे. शहरातील गणेश मंडळांकडून सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर उपक्रम राबविले जात असून, त्यातून समाजात सकारात्मक वातावरण निर्माण होत आहे. अशा उपक्रमांना प्रोत्साहन मिळाल्यास गणेशोत्सवाची सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होईल, असे बाबर यांनी नमूद केले.

या वेळी आमदार हेमंत रासने, आमदार अमित गोरखे, महापौर रवि लांडगे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, कला, क्रीडा, सांस्कृतिक व पर्यटन समितीचे सभापती कैलास कुटे, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, चिंचवड देवस्थानचे विश्वस्त मंदार देव महाराज यांच्यासह गणेश मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पारितोषिकप्राप्त गणेश मंडळांचे बाबर यांनी अभिनंदन केले. गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा, संस्कृती आणि समाजहिताची भावना अधिक बळकट व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## “सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा” जनजागृती मोहीम आणि एमआयटी एसीएससी कॉलेजचा स्थापना दिन उत्साहात साजरा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी येथे महाविद्यालयाचा स्थापना दिन “सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा” या जनजागृती मोहिमेसह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यामध्ये जबाबदार डिजिटल वर्तनाबाबत जागरूकता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. दोन सत्रांमध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमाला एकूण सुमारे ७०० सहभागींनी उपस्थिती लावली.**



या कार्यक्रमास पोलीस अधिकारी सौ. वर्षा शिंदे आणि सौ. वंदना शिंदे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे, उपसंचालक डॉ. अक्षदा कुलकर्णी आणि डॉ. मानसी अतितकर तसेच कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. अमित तळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या शुभप्रसंगी विद्यार्थी परिषद, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे खास आकर्षण ठरले ते म्हणजे राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) स्वयंसेवकांनी सादर केलेली पथनाट्य (स्किट). सायबर फसवणुकीचे विविध प्रकार — बनावट कॉल्स, ओटीपी घोटाळे, फिशिंग लिंक्स आणि सोशल मीडियावरील धोके — या स्किटद्वारे अत्यंत प्रभावीपणे व मनोरंजक पद्धतीने मांडण्यात आले, ज्यामुळे उपस्थितांना सायबर सुरक्षेचा संदेश सहज समजण्यास मदत झाली आणि उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळाली.

याशिवाय “स्पॉट द स्कॅम चॅलेंज”, “सायबर मिथ व्हर्सेस फॅक्ट” यांसारख्या परस्परसंवादी उपक्रमांद्वारे बनावट ईमेल, ओटीपी फसवणूक, फिशिंग लिंक व क्यूआर कोड फसवणुकीबाबत विद्यार्थ्यांना सजग करण्यात आले. तसेच “सायबर सुरक्षा प्रतिज्ञा फलक” उपक्रमांतर्गत उपस्थितांनी सुरक्षित डिजिटल वर्तनाची शपथ घेतली.

या प्रसंगी “सायबर सिक्युरिटी हँडबुक” चे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले असून, विद्यार्थ्यांना क्यूआर कोडद्वारे हे हँडबुक डाउनलोड करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सायबर वॉरियर क्लब, आयटी/सायबर सेल, एनएसएस स्वयंसेवक व विद्यार्थी स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

DTE Code 6310

Approved by AICTE | Accredited by NAAC | Accredited by NBA

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |



Highest Package for PCET-Nutan
**61 Lakh P.A.**

Average Salary Package
**5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:
**8830992988 / 7423080910 / 9028101155**



Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507